# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. गिरमल्ला शिवाप्पा कत्ते,<br>मु. पो. उटगी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. गिरमल्ला शिवाप्पा कत्ते, मु. पो. उटगी, ता. जत, जि. सांगली यांनी दि. ९.२.२०१० मंचाकडे अनुसूचि अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द तक्रार दाखल केली आहे, त्याचा तपशील खालील प्रमाणे–

तक्रारदार यांनी आपल्या शेतात विद्युत पुरवठा मिळावा यासाठी वितरण कंपनीच्या संख उप विभागाकडे संपर्क साधला होता. तक्रारदार यांना त्यांच्या उटगी येथील शेतात विधनविहिरीसाठी गट क्र. १७५/१ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा पाहिजे होता.

त्यांचे म्हणण्यानुसार त्यांचेपूर्वी श्री. चनाप्पा कलाप्पा कळ्ळी, रा. उटगी यांना व तक्रारदार यांना दि. २८.७.२००८ रोजी विद्युत पुरवठा केला आहे. परंतु श्री. कळ्ळी यांनी उभी केलेल्या वाहिनीवरुन व त्या वाहिनीच्या पुढे मे. फिरोज इलेक्ट्रीकल, जत यांचेकडून वाहिनी उभी केली आहे. श्री. कळ्ळी यांनी व त्यापुढे तक्रारदार यांनी स्वखर्चाने वाहिन्या उभ्या केल्या आहेत. परंतु वि.प.ने त्या कंपनीच्या मालकीच्या झाल्या आहेत असे करारपत्र करुन घेतले आहे. ग्राहकाने वि.प.कडून तात्काळ विद्युत पुरवठा मागितला असेल तर डी.डी.एफ. योजनेतून तो द्यावा अशी मंजुरी आहे, त्यानुसार तक्रारदार यांनी अर्ज केला व मंजुरी दि. १९.१.२००८ रोजी दिली व कोटेशनप्रमाणे रु. २९३२/- पावती क्र. २२५४५१८ नुसार भरले. तक्रारदाराचे म्हणणे की, वि.प.ने मा. राज्य विद्युत नियामक आयोग यांच्या आज्ञेचे पालन न करता सर्वांची दिशाभूल केली आहे. आयोगाचा आदेश केस क्र. ५६/२००७ दि. १६.२.२००८ नुसार डी.डी. एफ. योजना महावितरणने कशा पध्दतीने राबवायची व अंमलबजावणी करावयाची या बाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे क्ष फॉर्ममध्ये दि. ३०.११.२००९ तक्रार दाखल केली, अद्याप आदेश झाले नाहीत. तक्रारदार यांनी अशाच प्रकरणातील केस क्र. ३६/२००९ दि. १९.१२.२००९ मधील आदेशाची माहिती घेवून वि.प.ने चुकीच्या पध्दतीने डी.डी.एफ. योजनेतून विद्युत पुरवठा केला याबाबत तक्रारीमधील पान क्र. २,३, ४ व ५ वर आक्षेप नोंदविले आहेत. त्याचा सारांश थोडक्यात खालील प्रमाणे –

डी.डी.एफ. योजना म्हणजे काय ?

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम २००५ दि. २०.१.२००५ पासून अंमलात आले आहे. त्यातील कलम जी मध्ये डी.डी.एफ. ची व्याख्या उदधृत केली आहे. ती खालील प्रमाणे –

(G) Dedicated Distribution Facilities means such facilities, not including a service line forming part of the distribution system of the Distribution Licensee which are **clearly and solely dedicated** to the supply of electricity to a single consumer or a group of consumers on the same premises or continguous premises.

मा. आयोगाची केस क्र. ५६/२००७ मधील आदेशानुसार

Consumers should not be burdened with infrastructure costs which is the liability of MSEDCL

वि.प.ने प्रस्तुतच्या केस क्र. ५६/२००७ नुसार डी.डी.एफ. योजनेची अंमलबजावणी करतांना महत्वाच्या तांत्रिक व आर्थिक बाबींची वितरण कंपनीने काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे, अन्यथा हा मा. आयोगाच्या आदेशाचे पालन न करणे या बाबत विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४२ वा कलम १४९ नुसार कारवाईची मागणी करण्या इतपत गंभीर बाब होवू शकते. वरील आदेशानुसार वि.प.च्या मुख्य कार्यालयाने परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ रोजी सर्व स्तरावरील प्रसिध्दीसाठी पारित केले आहे. त्याचा मुख्य हेतू हा मा. आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ डी.डी.एफ. योजनेबाबतची माहिती व अंमलबजावणीबद्दल आहे. थोडक्यात पॅरा. ४ अंतर्गत पान क्र.३ अनुसूचि अ मध्ये म्हटल्याप्रमाणे –

D.D.F. means a separate distribution feeder or line emanating from a transformer or a sub station or a switching station laid exclusively for giving supply to a consumer or a group of consumers. It can not be shared in future by other consumers. Such facilities can not be imposed on a consumer.

आणि जर ग्राहक अशी डी.डी.एफ.ची सवलत नको असे म्हणत असेल तर वितरण कंपनीने स्वत: असे इन्फ्रॉस्टक्चर उभे करावे व विद्युत पुरवठा कलम ४३ विद्युत कायदा २००३ व कृती मानके विनियम २००५ नुसार करण्यात यावा. तक्रारदाराचे म्हणणे की, वितरण कंपनीने परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अशा वीज जोडणीचे स्वतंत्र अकौंट ठेवावे असे आदेश दिले आहेत. आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ मा. आयोगाच्या केस क्र. ३६/०९ मधील आदेशाचा आधार घेतला आहे. तरी अशाप्रकारचे चलन क्र. १३२९ दि. १०.१२.२००९ जत तालुक्यात देण्यात आले आहे. तक्रारदाराने पान क्र. ५ वरील पॅरा. १० मध्ये वि.प.ने चुकीच्या पध्दतीने डी.डी.एफ. योजनेतून विद्युत पुरवठा केला आहे. हे कटू सत्य कवठे महांकाळ विभागाच्या पत्र क्र. ५४०६ दि. १४.९.२००९ नुसार स्पष्ट होते. यामुळे मा. आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशाचा उपमर्द झाला आहे, कारण वाहिनीचा खर्च तक्रारदाराने केला असतांना वि.प.ने स्वत:ची मालकी असलेचा करार करुन घेतला आहे. वि.प.ने मा.आयोगाची केस क्र. ३६/२००९ मध्ये प्रतिज्ञापत्रासह मा. आयोगाला कळविले आहे की, डी.डी.एफ. योजनेमधून वीज पुरवठा दिलेला ग्राहक श्री. नदाफ यांनी केलेला अंदाजपत्रकीय खर्चा एवढी रक्कम आम्ही देयकाच्या माध्यमातून परत देणेस तयार आहोत. त्यामुळे वि.प.ने चुकीच्या पध्दतीने वीज पुरवठा केला आहे / करीत आहे हे मान्य केल्याचे दिसते. या मंचाकडे तक्रारीत मागणी केल्याप्रमाणे पान क्र. ८ वर चुकीच्या पध्दतीने वीज पुरवठा दिला आहे याची निश्चिती व्हावी व कंपनीने मा. आयोगाच्या वरील आदेशाचे पालन केले नाही हे जाहीर होवून मिळावे अशी विनंती केली आहे.

तसेच श्री. चनाप्पा कलाप्पा कळ्ळी यांचे वाहिनीपुढे तक्रारदाराने जी वाहिनी तयार केली आहे तेवढ्यावाहिनीसाठी वितरण कंपनीने केलेल्या अंदाजपत्रका एवढी रक्कम एकरकमी रोख देण्याचे आदेश व्हावेत अशी तक्रारदाराने विनंती केली आहे. त्या अगोदर विद्युत पुरवठा हा मा.आयोगाची केस क्र ५६/२००७ आदेशानुसार आहे काय ? या बाबत वि.प.ने लेखी निराकरण करावे. टॅपिंग करुन वीज पुरवठा दिला असलेने मा. आयोगाच्या आदेशाच्या विपरीत कृती आहे का ? वि.प.ने करार करुन घेतला असेल तर त्याची प्रत हजर करावी. तसे असेल तर, मा. आयोगाच्या आदेशाप्रमाणे solely or clearly dedicated वीज पुरवठा तक्रारदारास दिला आहे काय ? नसलेस ही कृती मा. आयोगाच्या आदेशाच्या विपरीत आहे काय ? या व इतर पॅरा ५ व ६ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे वि.प.ने सर्व मुद्दयांचे लेखी निराकरण करावे अशी मागणी केली आहे. तसेच वि.प.च्या परिपत्रकानुसार वेगळे अकौंट ठेवले आहे काय ? अशा मागण्या केल्या आहेत.

वितरण कंपनीने आपल्या दि. १५.३.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी शेतीपंपास विद्युत पुरवठा मिळावा यासाठी दि. १९.२.२००८ रोजी अनामत रक्कम भरली हे मान्य केले आहे. त्यांना डी.डी.एफ योजनेनुसार मंजुरी देण्यात आली आहे. तक्रारदार व श्री. चन्नाप्पा कलप्पा कळ्ळी, रा. उटगी यांना एकत्ररित्या ०.४२ कि.मी. लघुदाबाची लाईन मंजूर केलेली आहे व त्याचा क्र. ईई/सांगली(ग्रा)/डिडिएफ/८२९/०७–०८ असा आहे. तक्रारदार यांना ०.०६ कि.मी. लाईन लागते. तक्रारदार श्री. कत्ते यांनी स्वत:च्या मर्जीनुसार डी.डी.एफ. योजनेअंतर्गत स्व: खर्चाने ०.०६ कि.मी. लघुदाब वाहिनी कंपनीच्या मार्गदर्शनाखाली उभी करुन घेतलेली आहे. ही लाईन सद्या असलेल्या लघुदाब वाहिनीच्या जाळ्यातून विस्तार करुनच घेतलेली आहे व स्वतंत्र उच्चदाब वाहिनी/रोहित्र/ सब स्टेशन उभारणी करुन घेतलेली नाही. लाईनचा नकाशा जोडत आहे असे म्हटले आहे परंतु जोडला नाही. सदरच्या कामाचा करारनामा झालेला असून त्यामध्ये लाईन हस्तांतराची कोठेही नोंद नाही, फक्त गुणवत्तेबाबत उल्लेख आहे.

वितरण कंपनीने सदरचे काम हे डी.डी.एफ. योजने अंतर्गत केलेले असून कंपनीने काम करीत असतांना मा. आयोगाच्या कुठल्याही आदेशाचे उल्लंघन करण्याचा हेतू नव्हता व कंपनीही आयोगाच्या आदेशाचे आदर करीत राहील. तक्रारदार यांनी आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ मा. आयोगाची केस क्र. ३६/०९ मधील दि. २९.१२.२००९ च्या आदेशाचा दाखला देवून अंदाजपत्रकातील रक्कम एक रकमी रोख एक महिन्यात द्यावी अशी विनंती केली आहे. तो आदेश या तक्रारीस लागू होत नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी मागणी केलेली रक्कम द्यावी असा आदेश होवू नये अशी वि.प.ने मंचास विनंती केली आहे. वितरण कंपनी मा. आयोगाच्या आदेशाच्या आधीन राहूनच कार्य करते त्यामुळे कलम १४२ व १४९ नुसार कार्यवाहीची याचिका मा. आयोगाकडे करण्यास मिळणेबाबत आदेश व्हावा ही तक्रारदाराची विनंती मान्य करण्यात येवू नये अशी वि.प.ने विनंती केली आहे.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ७.४.२०१० ठेवण्यात आली होती. वि.प.च्या अर्जावरुन तारीख वाढवून सुनावणी दि. २०.४.२०१० ला घेण्यात आली. तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी दि. ८.४.२०१० रोजी मंचाकडे अर्ज पाठवून वि.प.ने तक्रारीत मागणी केल्याप्रमाणे लेखी उत्तरे दिली नाहीत ती मंचाकडे द्यावीत. मूळ तक्रारीत मागणी केल्याप्रमाणे वाहिनी उभी करावयाचा खर्च एकरकमी व विद्युत कायदा २००३ च्या कलम ६२:६ मधील तरतुदीनुसार सदरची रक्कम व्याजासह परत मिळावी अशी तक्रारदाराने मागणी केली आहे.

तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी आपल्या मंचासमोर केलेल्या तोंडी विवेचनात डी.डी.एफ. योजनेची अंमलबजावणी चुकीची झाली आहे. तक्रारदार यांना डी.डी.एफ. योजनेखाली दिलेला विद्युत पुरवठा हा एस.ओ.पी. व शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विसंगत आहे. श्री. खापरे यांनी मंचाचे लक्ष विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३ व ४६ मधील तरतुदी आणि शेड्यूल ऑफ चार्जेस, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी ) विनियम २००५ कडे मंचाचे लक्ष वेधले व असे प्रतिपादन केले की, कलम ४३ नुसार वितरण कंपनीने तक्रारदार यांस अर्ज दिल्यानंतर एक महिन्यामध्ये विद्युत पुरवठा करावा. तसेच कलम ४६ नुसार वि.प.स झालेला खर्च वसूल करण्याचे अधिकार आहेत.परंतु या ठिकाणी जरी तक्रारदार यांस त्याचे अर्जावरुन दि. २८.७.२००८ रोजी विद्युत पुरवठा केला तरी तो वि.प.ने डी.डी.एफ. योजनेतील तरतुदीच्या उलट कृती केली आहे. यापूर्वी वीज मंडळ ग्राहकाकडून मिटरची किंमत, कपॅसिटर टेस्टिंग फी इ. खर्च वसूल करत होते. परंतु एम.ई.आर.सी. केस क्र. ७०/२००५ आदेश दि. ८.९.२००६ नुसार वि.प.ने इन्फ्रॉस्ट्रक्चरचा खर्च स्वत: करुन विद्युत पुरवठा द्यावा. तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी ) विनियम २००५ मधील कलम २जी प्रमाणे डी.डी.एफ. योजनेची अंमलबजावणी झाली नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होते. श्री. खापरे यांच्या म्हणण्यानुसार डी.डी.एफ. योजना ग्राहकाला सवलत आहे, शेतीपंपासाठी सेवा योजना आहे. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात जरी मा. आयोगाच्या आदेशांचे पालन करीत आहे असे म्हटले असले तरी प्रत्यक्षात तसे नाही. मा. आयोगाची केस क्र. ५६/२००७ मधील आदेशाचा संदर्भ घेतला आहे. त्यावरुन हे स्पष्ट होते की,

Mere extension or tapping of existing line LT HT can not be treated as dedicated distribution facilities तसेच डी.डी.एफ. मध्ये separate distribution feeder जे स्वतंत्ररित्या किंवा लाईन ट्रान्स्फॉर्मर पासून सुरु करुन घेतली अथवा सब स्टेशन अथवा स्विचींग स्टेशन पासून सुरु करुन घेतली अशी लाईन जी केवळ डी.डी.एफ. योजनेमधील ग्राहकासाठी निर्माण केली आहे.

येथे वि.प.ने प्रथमत: श्री. चन्नाप्पा कलप्पा कळ्ळी व तक्रारदार यांना ७ पोलची लाईन दोघांत वाटून दिली. तक्रारदार यांस सेपरेट फिडरवरुन विद्युत पुरवठा केलेला नाही, अगोदर भावाला व नंतर तक्रारदाराला दिला आहे. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांच्या तक्रारीतील उपस्थित केलेल्या शंकाबाबत अथवा मागणी बाबत कांहीच म्हणणे दिले नाही. श्री. खापरे यांनी तक्रारीत उल्लेख केल्याप्रमाणे दि. २२.४.२००७ चे वि.प.चे पत्र ज्यामध्ये केस क्र. ८२/०६ मधील मा. आयोगाच्या आदेशाचे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच वि.प.च्या दि. १४.९.२००९ च्या पत्रावर जोर देवून तक्रारदाराने म्हटल्याप्रमाणे त्यांस दिलेला विद्युत पुरवठा हा निश्चितपणे मा. विद्युत नियामक आयोगाच्या डी.डी.एफ. योजनेच्या विरुध्द कृती करुन दिलेला आहे. त्यामुळे तक्रारीत मागणी केल्याप्रमाणे ०.०६ कि.मी.लाईनचे अंदाजपत्रकाप्रमाणे जवळजवळ रु. १३,०००/- विद्युत कायदा २००३, कलम ६२:६ मधील तरतुदीनुसार व्याजासह तक्रारदार यांस देणेबाबत वि.प.स आदेश द्यावेत अशी मागणी केली. आपल्या तक्रारीतील मुद्याला व तोंडी विवेचनाला पुष्टी यावी म्हणून मा. लोकपाल यांची केस क्र. २६/२०१० मधील दि. ३०.३.२०१० चा आदेश, केस क्र ९६/०८ दि. २०.१.२००९, अपील क्र. २२/२००७ म्हणजे Appellant Tribunal for Electricity चा न्याय निर्णय दि. १४.५.२००७ यावर भर दिला आहे. तसेचश्री. मौंला शेकू नदाफ यांची केस क्र. ३६/२००९ मधील दि. १९.१२.२००९ च्या मा. आयोगाच्या आदेशावर भर दिला आहे.

या उलट, वि.प. तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. त्यांनी तक्रारदाराचे हिश्याचे अंदाजपत्रकाप्रमाणे रक्कम रु. १२६६२/- व संपूर्ण अंदाजपत्रक रु. ८८६३४/- चे असून ७ पोल बाबतचे आहे. सदरची रक्कम रु. १२६६२/- ही तक्रारदार यांस वीज बिलातून व्याजासह परत देण्याची तयारी दर्शविली. यांस श्री. खापरे यांनी आक्षेप घेवून केस क्र. ३६/२००९ मधील आदेशानुसार प्रस्तुतची रक्कम रोखीने व्याजासह तक्रारदार यांस द्यावी व कलम ६२:६ विद्युत कायदा २००३ नुसार बँकेच्या व्याज दराने व्याज द्यावे अशी मागणी केली.

वरील विवेचनानुसार खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांनी श्री. चन्नाप्पा कलप्पा कळ्ळी यांचे वाहिनीपुढे जी वाहिनी तयार केली त्यासाठी वि.प.ने केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे एकरकमी रोख रक्कम मिळणेस हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

२) आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंचे कथनानुसार तक्रारदार श्री. गिरमल्ला शिवाप्पा कत्ते व श्री. चन्नाप्पा कलप्पा कळ्ळी, रा. उटगी या दोघांना वि.प.ने डी.डी.एफ. योजनेतून नवीन विद्युत पुरवठा मंजूर केला आहे हे स्पष्ट होते.श्री. कळ्ळी यांस दि. २८.१.२००८ व तक्रारदार यांस दि. २८.७.२००८ या तारखेस विद्युत पुरवठा केला आहे. तक्रारदाराने अर्ज केल्यानंतर वि.प.ने ईई/सांगली(ग्रा)/डिडिएफ/८२९/०७-०८ दि. २८.१.२००८ चे मंजुरीप्रमाणे चलन क्र. ४०१ दि. २९.१.२००८ नुसार तक्रारदार यांनी ते दि. १९.२.२००८ भरले आहे. तक्रारदार या वि.प.च्या चुकीच्या कृतीत भागिदार आहेत अथवा अशी चूक करण्यात बळी पडला आहे हे त्याचे कथनानुसार स्पष्ट होते. तथाकथित करारपत्र वि.प.ने मंचासमोर हजर केले नाही त्याचप्रमाणे ते रद्द केले नाही.

तक्रारदाराने मा.आयोगाची केस क्र. ५६/२००७ मधील दि. १६.२.२००८ च्या आदेशानुसार वि.प.ने जारी केलेले दि. २०.५.२००८ चे परिपत्रक याच्या उलट वि.प.ने कृती केली हे स्पष्ट होते. (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी ) विनियम २००५ मधील कलम २जी मध्ये दिलेल्या Dedicated Distribution Facilities च्या व्याख्येनुसार तक्रारदार यांस दिलेला विद्युत पुरवठा निश्चितपणे नाही हे स्पष्ट होते. तक्रारदार यांस आजवर ही सवलत लादलेली आहे असे दिसते आणि अशा सवलतीची अंमलबजावणी करतांना प्रत्यक्षात सुरुवातीला ७ पोलची लाईन दोघांत वाटून देवून तक्रारदार यांस स्वतंत्र फिडरवरुन विद्युत पुरवठा न देता अगोदर त्याच्या हिश्शेदाराला व नंतर त्यांना दिला आहे. वि.प.ने हे कुठेही अमान्य केले नाही, अर्थात ते लेखी अहवालावरुन स्पष्ट होते. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात श्री. चन्नाप्पा कलप्पा कळ्ळी, उटगी व तक्रारदार श्री. गिरमल्ला शिवाप्पा कत्ते यांना एकत्रित ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनी मंजूर केलेली आहे. त्यापैंकी तक्रारदार यांस ०.०६ कि.मी. वाहिनी लागते. ही कृती डी.डी.एफ. व्याख्येच्या अगदी विरुध्द आहे, कारण असा विद्युत पुरवठा Clearly and solely dedicated to single consumer अर्थात श्री. कत्ते यांना दिला गेला नाही हे स्पष्ट होते. वि.प.ची अशीही केस नाही की, श्री. चन्नाप्पा कलप्पा कळ्ळी व इतर हे group of consumers on the same premises or continguous premises या संज्ञेत मोडतात. त्यामुळे त्यांच्या कृतीने मा. आयोगाच्या आदेशाचा भंग झालेला नाही किंवा केस क्र. ५६/२००७ मधील आदेशाच्या विरुध्द नाही किंवा त्यास अनुसरुन आहे असे म्हणता येणार नाही, कारण ही सवलत can not be shared in future by other consumers अशी आहे व तक्रारदार यांना दिलेली वीज जोडणी या अटीच्या विरुध्द आहे. तसेच स्वतंत्र डिस्ट्रीब्यूशन फिडरवरुन अथवा line emanating from a transformer or sub station अथवा a switching station laid exclusively for giving supply to consumer or a group of consumers या मध्ये बसत नाही. केस क्र. ५६/२००७ दि. १६.२.२००८ च्या आयोगाच्या आदेशा मधील पॅरा. १२ अंतर्गत पृष्ठ क्र. ५ मधील निरीक्षण खालील प्रमाणे आहे.

12 (1) Since, MSEDCL do not have a clear conception of Dedicated Distribution Facility and the levy of ORC in the EA 2003 regime, it is necessary to provide guidance on the same and issue necessary directions as under :
(विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी ) विनियम २००५ मधील कलम २जी मध्ये डी.डी.एफ. ची व्याख्या देवून पुढे असे म्हटले आहे की,

That mere extension or tapping of the existing line (LT or HT) can not be treated as Dedicated Distribution Facility. Such extension or tapping being part of the common network will be affected dut to any fault or outages on the common network and cannot be considered as a facility solely or clearly dedicted for giving supply. Thus, in the distribution system, Dedicated Distribution Facility means a separate distribution feeder or line emanating from a transformer or a substation or a switching station laid exclusively for giving supply to a consumer or a group of consumers.

Also Dedicated Distribution Facility can not be shared in future by other consumers.

कदाचित यामुळे वि.प.ला परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ रोजी असे परिपत्रक काढावे लागले व त्यात डी.डी.एफ. योजनेखाली विद्युत पुरवठा केला असेल तर A separate account of such connections shall be maintained for official purpose अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

तक्रारदाराचे केसमध्ये वि.प.ने असे स्वतंत्र अकौंट ठेवले आहे अशी माहिती दिली नाही. त्यामुळे असे स्वतंत्र अकौंट न ठेवणे ही वि.प.ची कृतीसुध्दा मा. विद्युत आयोगाच्या आदेशाविरुध्द व आदेशाचा उपमर्द करणारी आहे असे दिसते. येथे एक गोष्ट स्पष्ट कराविशी वाटते की, वि.प.चे अधिकारी श्री. भोसले यांनी अंदाजपत्रकातील रकमेतून तक्रारदाराच्या हिश्याच्या ०.६ कि.मी. वाहिनी खर्चाची रक्कम रु. १२६६२/- ही परत देण्याची तयारी दर्शविली आहे. याचाच अर्थ वि.प.च्या त्यावेळच्या अधिकाऱ्यांनी डी.डी.एफ. योजना पूर्णपणे चुकीच्या पध्दतीने राबविली आहे किंवा केवळ डी.डी.एफ. हे गोंडस नांव देवून तक्रारदार यांस लाईन उभी करण्यासाठीच्या खर्चात टाकले व करारनामा करणेस भाग पाडले आहे हे स्पष्ट होते. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचे मा. लोकपाल, मुंबई यांची केस क्र. २६/२०१० अभिनंदन एंटरप्रायझेस अथवा केस क्र. ९६/२००८ न्यायनिर्णय दि. २३.१.२००९ बद्दल फारशी चर्चा करणेची गरज नाही. परंतु विद्युत पुरवठा मंजुरीची तारीख २८.१.२००८ व प्रत्यक्ष विद्युत पुरवठा दि. २८.७.२००८ आणि मंचाकडे तक्रार दाखल दि. ९.२.२०१०, यावरुन कदाचित तक्रार मुदतबाह्य दोन वर्षानंतर दाखल केली आहे. मा. लोकपाल, मुंबई यांनी एस.एस. अभिनंदन एंटरप्रायझेस मधील पॅरा. क्र. १० मध्ये निरीक्षण केलेप्रमाणे तक्रार ही २ वर्षानंतरची आहे. भांडूप मंचाने सदर केसच्या गुणवत्तेवर आधारित मत मांडले आहे की, तक्रारदाराकडून वसूल केलेले एस.एस.सी. चार्जेस हे मा. आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विरुध्द असून ते परत मिळण्यास तक्रारदार हा हक्कदार आहे. परंतु विनियमाच्या कलम ६.६ प्रमाणे तक्रार मुदतबाह्य असलेमुळे तक्रारदारास न्याय (रिलीफ) दिला नाही. त्यामुळे मुदतीची बाधा येईल या भितीपोटी तक्रारदाराने मा. लोकपाल यांचे आदेश दिले आहेत असे वाटते. ते आदेश प्रस्तुत केसला लागू करुन मुदतीची बाधा तक्रारीस येत नाही किंवा दि. २८.१.२०१० नंतर केवळ १० दिवसांतच मंचाकडे तक्रार दाखल केली आहे त्यामुळे तो किरकोळ विलंब होत आहे असे म्हणावे लागेल. अशी वि.प.ची कृती मा. विद्युत नियामक आयोग केस क्र. ५६/०७ व परिपत्रक क्र. २२१९७ दि. २८.५.२००८ आणि विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ मधील डी.डी.एफ. च्या बाबतीत असलेने तक्रारदाराचा पैंसे परत मिळण्याचा हक्क अबाधित राहतो असे म्हणावे लागेल. केस क्र. ९६/२००८ रविंद्र आनंद देसाई विरुध्द वितरण कंपनी मध्ये ज्याअर्थी Reg.22 of MERC (CGRF and Electricity Ombudsman) Regulation 2006 चा उल्लेख आहे. जेव्हा Non-compliance of orders हा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा Commission may initiate proceedings suo motu or on a complaint filed by any person to impose penalty or prosecution proceeding under Sections 142 and 149 of the Act.

थोडक्यात विनियम २००६ चे कलम २२ नुसार शिक्षेची तरतूद आहे. जर ग्राहक मंचाचे विनियम ८.७ आणि मा. लोकपालचे विनियम १७.१८ नुसार आदेशाची पूर्तता केली नाही तर शिक्षेची तरतूद आहे.

तक्रारदार यांनी आपल्या तक्रारीत मा. आयोगाची केस क्र. ३६/०९ मधील श्री. नदाफ यांची केस ज्यामध्ये तक्रारदाराचे प्रतिनिधी, पॅरा. ११ मध्ये उल्लेखिलेप्रमाणे होते. वि.प.ने सदरच्या केसबाबत हास्यास्पद विधान केले आहे असे म्हणावे लागेल. आपल्या दि. १५.३.२०१० च्या लेखी अहवालात पॅरा.३ मधील केस क्र. ३६/०९ चा आदेश या तक्रारीस लागू होत नाही त्यामुळे तक्रारदारास परत रक्कम देण्यात यावी असे आदेश होवू नयेत. तक्रारदार यांनी केस क्र. ३६/०९ मधील दि. १९.१२.२००९ च्या आदेशाची झेरॉक्स प्रत हजर केली आहे. श्री. नदाफ यांनी मा. विद्युत नियामक आयोगाकडे वितरण कंपनी विरुध्द कलम १४२ अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी केली होती.

त्यांचे म्हणण्यानुसार मा. आयोगाची केस क्र. ५६/०७ मधील दि. १६.२.२००८ च्या आदेशाचे वि.प.ने पालन केले नाही. पॅरा. १२ मध्ये तक्रारदार यांनी संख उप विभाग यांनी डी.डी.एफ. योजना स्वत:च्या अधिकारात मंजूर केली ती मा. आयोगाच्या केस क्र. ५६/०७ मधील आदेशानुसार नाही. त्यामुळे वि.प.ने अंदाजपत्रकातील रक्कम परत देण्याची तयारी दर्शविली आहे मात्र ती रक्कम वीज बिलातून समायोजित करण्याची तयारी दर्शविली आहे. तक्रारदार यांनी आपल्या दि. १७.९.२००९ चे रिजॉयन्डरनुसार परताव्याची रक्कम एकरकमी मिळावी व बिलातून समायोजित करुन नको, असे केल्यास व्याज द्यावे अशी मागणी केली. मा. आयोगाची केस क्र. ३६/०९ मधील दि. १९.१२.२००९ च्या आदेशात पॅरा.१५ वरील शेऱ्याप्रमाणे –

The Opponent is hereby accordingly directed to refund the amounts undertaken to be so refunded by the Opponent itselt, at one go in lumpsum, in favour of the complainant.

त्यामुळे मा. आयोगाने कलम १४२ नुसार कारवाई करण्याची गरज नाही असे प्रतिपादन केले.

श्री. भोसले, कार्यकारी अभियंता अंदाजपत्रकातील रकमेतून तक्रारदाराच्या हिश्याच्या ०.६ कि.मी. वाहिनी खर्चाची रक्कम रु. १२६६२/– ही परत देण्याची व बिलात समायाजित करुन देणेची तयारी दर्शविली आहे. परंतु मा. आयोगाकडील केस क्र. ३६/०९ मधील दि. २९.१२.२००९ च्या आदेशाचा विचार करता, सदरची रक्कम एकरकमी व्याजासह तक्रारदार यांस रोखीने देणयाचे आदेश वि.प.स देणे योग्य व कायदेशीर होईल.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ९.२.२०१० ला दाखल झाल्यावर दि. १५.३.२०१० व दि. ७.४.२०१० ला वि.प.ने सुनावणीची तारीख वाढवून मागितली, त्यामुळे ती दि. २०.४.२०१० ला घेण्यात आली. तसेच मंचाकडील केस १९७/०९ बाळकृष्ण हॅचरिज, मिरज, २२४/०९, २०१/०९ श्री. आईस, सोलापूर व तक्रार क्र ५९–६०/२०१० व ६१/२०१० कोल्हापूर विभागातील प्रकरणे आणि इतर चलनाची प्रकरणे यामध्ये मंचाचा सुनावणी व निर्णयासाठी बराच वेळ गेल्याने, सदर प्रकरण दोन महिन्याच्या मुदतीमध्ये निकालात काढता आले नाही.

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीच्या कवठे महांकाळ विभाग /संख उप विभागाने तक्रारदार यांस रु. १२६६२/– एकरकमी रोखीने/चेकने व त्यावर दि. २८.७.२००८ पासून ते रक्कम देईपर्यंत १२% व्याज द्यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :